आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ एप्रिल २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचं ग्रीन आशा हे नववं जहाज एलपीजी टँकर घेऊन होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून रवाना

- चारचाकी वाहन विक्रीत गेल्या आर्थिक वर्षात १३ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ

- राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

- विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आसाम दौऱ्यावर

**आणि**

- इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर आज केलेल्या हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू

**<><><><><><>**

ग्रीन आशा या एलपीजी टँकर घेऊन येणाऱ्या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली आहे. आखातात सुरु झालेल्या संघर्षानंतर ही सामुद्रधुनी पार करुन भारतात येणारं हे नववं जहाज आहे. ४६ हजार ६५० मेट्रिक टन इंधन घेऊन आलेल्या ग्रीन सान्वी या दुसऱ्या टँकरनेही प्रवास पूर्ण केला आहे. या भागातून भारतीय जहाजांची वाहतूक सुरु आहे. BW TYR, BW ELM, पाईन गॅस आणि जग वसंत अशा जहाजांनी एकत्रितपणे ९२ हजार टन LPG वाहून आणला तर जग लाडकी आणि जग प्रकाश या जहाजांनी संयुक्त अरब अमिराती आणि ओमानमधून कच्चं तेल आणि गॅसोलीन आणल आहे.

**<><><><><><>**

योग्य ओळखपत्रावर वितरकांकडून उपलब्ध होणाऱ्या ५ किलोग्रॅम वजनाच्या LPG सिलेंडरचा पुरवठा सरकारने वाढवला आहे. विनाअनुदानित आणि

बाजारभावाने विकल्या जाणाऱ्या अशा ६ लाख ६० हजार सिलेंडर्सची विक्री २३ मार्चनंतर झाल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. ग्राहकांनी ऑनलाईन बुकिंगचा पर्याय निवडावा, वितरकांकडे अनावश्यक गर्दी करु नये अशीही सूचना सरकारने केली आहे. LPG सिलेंडरचा काळा बाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने कडक पावले उचलली आहेत. नियमित तपासणी, सूचना आणि संपर्कातून अशा प्रकारच्या साठेबाजीला आळा घालण्याबाबतच्या सूचना राज्ये तसंच केंद्रशासित प्रदेशांना दिल्या आहेत.

**<><><><><><>**

देशाच्या किरकोळ वाहन उत्पादन क्षेत्राने गेल्या आर्थिक वर्षात २ कोटी ९६ लाख ७१ हजार चारचाकी गाड्यांची विक्री केली आहे. ही वाढ १३ पूर्णांक ३ दशांश टक्के इतकी असून यंदा हा उद्योग वार्षिक तीन कोटींच्या टप्प्याजवळ आल्याचं फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशनने म्हटलं आहे. दुचाकी गाड्यांच्या विक्रीने कोविड काळानंतर पुन्हा उच्चांक गाठला असून गेल्या आर्थिक वर्षात २ कोटी १४ लाख इतक्या दुचाकी विकल्या गेल्या आहेत. ही वाढ १३ पूर्णांक ४ दशांश टक्के इतकी आहे. परवडणारी किंमत, ग्रामीण भागात सुधारलेलं उत्पन्न यांमुळे ही वाढ झाल आहे. ट्रॅक्टर विक्रीतही १८ पूर्णांक ९५ शतांश टक्के इतकी वाढ झाली असून गेल्या आर्थिक वर्षात सुमारे १० लाख पेक्षा जास्त ट्रॅक्टर विकले गेले आहेत.

**<><><><><><>**

राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, ज्योती वाघमारे, रामराव वडकुते या महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या सदस्यांचा त्यात समावेश आहे. राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी सदस्यांना शपथ दिली.

<><><><><>

छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री अजित जोगी यांचा मुलगा अमित जोगी याला राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्याच्या खुनाप्रकरणी छत्तीसगड उच्च न्यायालयानं आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

<><><><><>

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराकरता सर्व राजकीय पक्षांची यंत्रणा वेगाने काम करत आहे. सर्वच पक्षांच्या स्टार प्रचारकांच्या सभा आणि रोड शो होत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधे बारपेटा इथं प्रचारसभा घेतली. भाजपा दूरदृष्टीनं विकसित आसाम - विकसित भारत या उद्दिष्टानं काम करत  असल्याचं त्यांनी भाषणात सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आज शेवटचा दिवस आहे. बारामतीमधून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उमेदवारी अर्ज भरणार आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी विनंती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यांनी समाजमाध्यमावर  केली आहे. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठीच्या काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेता येईल. असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं आज सांगिलं. राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी आतापर्यंत ४ उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला आहे. भाजपानं शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

भाजपाच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

समाजमाध्यमावर मोदी यांनी म्हटलं आहे की, पक्ष नेहमीच समाजाची सेवा करण्यात पुढे राहिलेला असून भारत प्रथम या ध्येयाला बांधील आहे. पक्षासाठी बलिदान आणि योगदान दिलेल्या अगणित कार्यकर्त्यांचं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये स्मरण केले आहे. भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात पक्षध्वजारोहण झालं. कार्यकर्त्यांना दिलेल्या शुभेच्छा संदेशात त्यांनी म्हटलं आहे की, जनसंघापासून ते देशातल्या सर्वात मोठ्या पक्षापर्यंतचा हा प्रवास त्याग निष्ठा आणि संयमाचं फलित आहे.

**<><><><><><>**

अरुणाचल प्रदेश राज्य सरकारनं दिलेल्या सार्वजनिक कामांच्या कंत्राट प्रकरणातल्या अनियमिततेची चौकशी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं केंद्रीय गुन्हे अन्वेषण अर्थात सीबीआयला दिले आहेत. ही कंत्राटं मुख्यमंत्री पेमा खांडू आणि त्यांच्या नातेवाईकांनाच देण्यात आल्याच्या आरोपानंतर सर्वोच्च न्यायालयानं हे निर्देश दिले आहेत. सीबीआयला आपला अहवाल सादर करण्यासाठी १६ आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

**<><><><><><>**

इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर आज केलेल्या हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू झाला. डोनाल्ड ट्रंप यांनी होर्मुजची सामुद्रधूनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत संपत आली असतानाच तेहरानमध्ये जोरदार धमाके झाले. शहरातल्या शरिफ विद्यापीठाजवळ धुराचा झाकोळ दिसून आला तर हाईफा भागातल्या निवासी इमारतीजवळ दोन जण मृतावस्थेत सापडले. इराणने आपल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यास इराणची उर्जा संयत्र, पूल यांच्यावर हल्ले होतील असं ट्रंप यांनी म्हटलं आहे. दरम्यान, इराणचे निवासी भाग लक्ष्य केले गेले तर अधिक जोरदार प्रत्युत्तर

दिलं जाईल असा इशारा इराणने दिला आहे. प्रत्युत्तरादाखल लाल समुद्र आणि एडनच्या आखाताला जोडणाऱ्या बाब अल मंदेब आखातात कारवाई करु असं इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या सल्लागारांनी म्हटलं आहे. यामुळे अटलांटिक, भारतीय आणि भूमध्य समुद्रातून होणाऱ्या जहाज वाहतुकीवर परिणाम होण्याचा धोका आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. कोलकात्यात ईडन गार्डन मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. बंगळुरू इथे काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चेन्नई सुपर किंग्जचा ४३ धावांनी पराभव केला.

**<><><><><><>**

पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या प्रभावामुळे देशाच्या उत्तर भागात हिमवृष्टी, पाऊस, आणि गारपीट होत आहे.

हिमाचल प्रदेशात अनेक ठिकाणी हिमवृष्टी, गारपीट आणि पाऊस झाल्यानं पिकांचं नुकसान झालं, तसंच जनजीवनावर परिणाम झाला. लाहौल स्पितीमधे हिमखंड कोसळा परंतु त्यात जीवितहानी झाली नाही. पुढच्या दोन दिवसात अनेक ठिकाणी विजांचा कडकडाट, आणि वादळी वाऱ्यांसह गारांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मध्यप्रदेश आणि राजस्थानातही अनेक ठिकाणी गारपीट आणि वादळी पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्रविभागाने अरुणाचल प्रदेश, केरळ, तमिळनाडू, आंध्रप्रदेशचा किनारी भाग, पुदुचेरी आणि कराईकलमधे आज मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. बिहार, झारखंड आणि पश्चिम राजस्थानात गारपीट होऊ शकते. आसाम, मेघालय, छत्तीसगढ, पश्चिम बंगालमधे गंगा खोऱ्याचा

प्रदेश, ओदिशा आणि विदर्भात विजेच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><><>**

एअर इंडियाने इस्रायलला जाणाऱ्या विमानसेवा रद्द केल्या आहेत. तेल अविवला जाणारी विमान उड्डाणं येत्या  ३१ मे पर्यंत स्थगित केल्याची माहिती एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांनी दिली. काही इस्रायली कंपन्या वगळता इतर सर्व कंपन्यांनी तेल अवीवकडे जाणाऱ्या विमानसेवा स्थगित केल्या आहेत. इस्रायलमध्ये कामकाजानिमित्ताने वास्तव्याला असणारे ४० हजार भारतीय यामुळे इस्रायलमध्ये अडकून पडले आहेत. त्यांना रस्ते मार्गाने जॉर्डन किंवा इजिप्तमध्ये येऊन पुढचा प्रवास करावा लागणार आहे. तेल अविवमधील भारतीय दूतावास त्यांच्या संपर्कात असून शनिवारी  दूतावासाने भारतीय कामगार आणि विद्यार्थ्यांना दूरदृश्य पद्धतीने मार्गदर्शन केलं. दरम्यान, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या दोन्ही कंपन्यांची मिळून पश्चिम आशियातली जवळपास तीस प्रवासी विमानं आज आखाती देशातून  वाहतूक करतील.

**//<><><><><><>//**